महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.१२/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ४७० दिनांक ०५ / १० / २०१३

**विषय** : वैद्यकीय तपासणी शुल्कामध्ये वाढ करण्याबाबत.

**संदर्भ** :प्रशासकीय परिपत्रक क्र.९० दि.१५.११.२००६.

.....

म.रा.वि.वि.कं.मर्या. कर्मचारी सेवाविनियम क्र.१२ अनुसार कंपनीमधील रिक्त पदांवर नियुक्त करण्यात येणाऱ्या व कंपनीच्या सेवेत पुढेही राहणार असण्याची शक्यता आहे अशा उमेदवारांची वैद्यकीय तपासणी आवश्यक करण्यात आली आहे. तसेच शारिरीक पात्रतेसंबंधातील सदर वैद्यकीय तपासणी अल्प मुदतीच्या नियुक्ती प्रकरणांव्यतिरीक्त प्रत्येक कर्मचाऱ्याला नियुक्तीच्या वेळी किंवा नियुक्तीच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने सा.आ.क्र.२० (क) दि.१७.०६.१९६३ अंतर्गत अशा वैद्यकीय तपासणीकरिताचे शुल्क प्रसृत करण्यात आले असून सदर शुल्कामध्ये वेळोवेळी वाढ करण्यात आलेली आहे.

२. कंपनीच्या मुख्य कार्यालय स्तरावर व भांडुप शहर परिमंडळ परिक्षेत्राअंतर्गत नियुक्ती करावयाच्या वेतनगट एक, दोन, तीन व चार मधील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या वैद्यकीय तपासणीकरिता कंपनीच्या वैद्यकीय सल्लागार यांना द्यावयाच्या वैद्यकीय तपासणी शुल्कामध्ये वाढ करण्यासंबंधीचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता. आता व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) आणि संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचारविनिमय करुन कंपनीच्या वैद्यकीय सल्लागार यांना अदा करावयाच्या सदर वैद्यकीय तपासणी शुल्कामध्ये वाढ करून ती प्रत्येकी रु.२५०/- ऐवजी प्रत्येकी रु.५००/- इतकी देण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

३. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे नियुक्ती करावयाच्या वेळी कंपनीचे वैद्यकीय सल्लागार यांना अदा करावयाच्या वैद्यकीय तपासणी शुल्कामधील वाढ दि.०१.१०.२०१३ पासून लागू होईल. तसेच सदर वैद्यकीय तपासणी शुल्काची रक्कम प्रकरणपरत्वे संबंधीत कार्यालये परस्पर अदा करतील.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

**( संदेश ए. हाके )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\Hospitals\Adm.Cir - Increase in Medical Fee.doc*
*01/10/2013*